**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 20/10/2020 (मंगळवार)
(सकाळ)

---

## अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण 6,92,000/-रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक 19/10/2020 रोजी ठाणेदार सपोनि श्री. सुरेश मटटामी, पोलिस स्टेशन केळवद व सोबत पो.स्टे. चा स्टाफ पो. स्टे. परीसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती माहिती मिळाली की, एक एमएच- 32/ सी- 7187 क्रमांकाची महिन्द्रा स्कॉरर्पीयो गाडी मध्ये पांढुर्णा मध्यप्रदेश कडुन विदेशी दारू भरून खुर्सापार नागपूर मार्ग जाणार आहे. अश्या विश्वसनिय खबरेवरून सपोनि श्री. सुरेश मटटामी हे खुर्सापार आरटिओ चेक पोस्ट येथे सोबत असलेल्या स्टाफच्या मदतीने नाकाबंदी लाउन मध्यप्रदेश कडुन येणारे वाहन चेक करीत असतांना दि. 19/10/2020 चे 19.00 वा. दरम्यान एक पांढऱ्या रंगाची एमएच- 32/ सी- 7187 क्रमांकाची महिन्द्रा स्कॉरर्पीयो गाडी भरधाव वेगाने येतांना दिसली. तेव्हा सदर स्कॉरर्पीयो गाडीचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने सदर वाहन त्या ठिकाणी न थांबता गाडी चालकाने गाडी हि पांढुर्णा नागपूर हायवे क्र. 47 वरून भरधाव वेगाने चालवुन नागपूर च्या दिशेने पळु लागला. त्याचा पाठलाग केला असता स्कॉरर्पीयो गाडी हि नॅशनल हायवे क्र. 47 वरून नागपूर च्या दिशेने पळु लागली स्कॉरर्पीयो गाडी समोर व स्टाफ तिच्या मागे पाठलाग करीत असतांना स्कॉरर्पीयो गाडीचे चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडवरील वाहतुकीस लोकांना धोखा निर्माण होईल अश्या स्थितीत चालवु लागला. स्कॉरर्पीयो गाडी बिहाळा फाटयाजवळ एक कंटेनर गाडी आडवी आल्याने स्कॉरर्पीयो गाडी चालकाने त्याची गाडी बिहाडा फाटा खापा शिवार येथे थांबवुन गाडी सोडुन पळण्याच्या तयारीत असतांना स्टाफनी गाडीचालकास व सोबत असलेल्या इसमास ताब्यात घेतले. त्यांचे नाव आरोपी नामे क्र. 1) इरफान मुस्तफा खान, वय 33 वर्ष, रा संत कबिर वार्ड हिंगनघाट जिल्हा वर्धा, 2) आकाश रविंद्र सोनाकर, वय 23 वर्ष, रा प्लाट न. 60 न्यु कैलाश नगर, अजनी, नागपुर यांचे ताब्यातुन गाडीमधून ड्रायवर सिटच्या मागे खाकी रंगाचे खोक्यावर 172800 मिली विदेशी दारू कि. 1,92,000/-रू. व 1 चार चाकी वाहन कि. 5,00,000/-रू. असा एकुण किमंती 6,92,000/-रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे- 3) गुलशन पौनीकर, वय 30 वर्ष, रा संत कबिर शिवाजी वार्ड हिंगनघाट जिल्हा वर्धा व 4) सुरेंद्र उर्फ संजु तायवाडे, वय 40 वर्ष, रा. खारी वार्ड मांगमोहल्ला पांढुर्णा मध्यप्रदेश हे फरार आहेत.

सदर प्रकरणी सर तर्फे पोशि सचिन येळकर यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. केळवद येथे आरोपीतांविरूद्ध अप क्र 220/2020 कलम 279, 34 भादवी सहकलम 65(अ), 81, 83 महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये सहकलम 184, 179, 192 मोवाका अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र. 1 व 2 ला अटक करण्यात आलेले आहे. पुढील तपास सपोनि श्री. सुरेश मटटामी हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार सपोनि श्री सुरेश मटटामी, नापोशी राजेन्द्र रेवतकर, पोशी धोंडुतात्या देवकते, चालक पोना गुणवंता डाखारे व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.



## चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 4 किमी अंतरावर राहाडी येथे दिनांक 11/10/2020 चे 17.00 वा. ते दिनांक 12/10/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अशोक देराव शेळके, वय 55 वर्ष, रा. राहाडी ता मौदा जि नागपुर हे घराला कुलुप लावुन गावी गेले होते. त्यादरम्यान फिर्यादी यांचे चुलत सासरे यांनी फोन करून सांगीतले की, ''तुझ्या घराचा लॉक तुटलेला आहे, तुझ्या घरी चोरी झाली आहे. फिर्यादीने अंदाजे 08.00 वा घरी जावुन पाहनी केली असता घराचे लॉक तुटलेले दिसले व आतील रूमधील कपाट तुटलेले दिसले. संशयीत आरोपी नामे– राजेन्द्र सदाशिव भोयर, रा. रहाडी ता. मौदा जि. नागपूर याने कपाटात ठेवलेले चांदीचे दोन जोडे पायपट्या किं. 3,000/– रू, नगदी 10,000/– रू, किचन मधील तेलाचा पिपा 15 किलो चा किंमती 500/– रू व मागील घरामध्ये ठेवलल्या तीन कोबंडया किंमती 9,00/– रू असा एकुण कि. 14,400/– रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा दिपक मानवटकर 9764007720 हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मालधक्का रेल्वे स्टेशन कन्हान येथे दिनांक 19/10/2020 चे 05.45 वा ते 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक अरविंद त्रिपाठी, वय 53 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 विवेकानंद नगर, कन्हान यांना आरोपी नामे– 1) हरविंदर सिंग पडा, 2) हरविंदर सिंग यांचा ड्रायवर रामु, 3) बिंदर सिंग पडा, 4) करमजित सिंग पडा व 5) अज्ञात सोबती सरदार सर्व रा. बाबा बुध्धाजी नगर, कन्हान यांनी संगनमत करून गैरकायदयाची मडंळी गोळा करून शिवीगाळ करीत ''तुम्हारे वजह से, हमारे ट्रक नही भर रहे हैं,'' असे म्हणुन फिर्यादीस व फिर्यादी सोबत असलेले तीन मित्रांना हातबुक्कीने, बेसबॉल डंडा, हॉकिस्टीक, लोखडीरॉड व बांबुच्या काठीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 324,323,504,143,147,148,149 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री सुरजुसे मो क्र 7666640218 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर